# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**
**Date - 22/ 06/2022**

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २१/०६/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २८ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १५,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**भारतीय हत्यार कायदा अन्वये विशेष मोहीम :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम. राकेश कलासागर यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन अवैधरित्या हत्यार बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहीम राबविण्यात येत आहे या मोहीमे अतंर्गत पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे ०२ इसमाविरूध्द कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद असुन पुढील तपास हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

**जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.